# K.P.C. PUBLIC SCHOOL, KHARGHAR
## Question paper 2022-23

**STD: VI** | **SUB: Marathi**

**Time – 2Hours.** | **Marks -४०**

---

**प्रश्न १) खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(४)**

बळ मिळविण्यासाठी शरीराला व्यायाम हवा. व्यायामाचे अनेक प्रकार आहेत. लाठी, दांडपट्टा यांसारखे नानाप्रकारचे सुटसुटीत सांघिक खेळ भारतात आहेत. खेळासारखी पवित्र वस्तू नाही. खेळात आपण अनेक गोष्टी शिकतो. खेळ म्हणजे निष्ठा, खेळ म्हणजे सत्यता, खेळ म्हणजे स्वत:चा विसर. आसनांनीही शरीराचे आरोग्य सुधारते. काम करताना मिळणारा व्यायाम हा सर्वोत्कृष्ट व्यायाम होय. व्यायाम हासुद्धा काहीतरी निर्माण करणारा हवा.जुने लोक पाहिले तर त्यांची शरीरे निरोगी दिसतात; परंतु हल्ली शरीरे तक्लुबी झाली आहेत. पांढरपेशांची अशी दैना आहे, तर श्रमजीवी लोकांचीही शरीरे विसावा व अन्न यांच्या अभावी कृश होत आहेत. श्रमहीनांस श्रम करावयास लावल्याशिवाय व श्रमिकांस भरपूर अन्न व विश्रांती दिल्याशिवाय सुदृढ होणार नाहीत.

प्रश्न - १) जुन्या लोकांची शरीर कसे दिसतात-

२) शरीराला व्यायाम कशासाठी हवा-

३) काम करताना मिळणारा व्यायाम हा कसा असतो-

४) श्रमजीवी लोकांची शरीरे कशा अभावी कृश आहेत -

**ब ) खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(४)**

पुढे एकदा शाळेची सहल दांडेली वनात गेली होती. सगळी मुले खेळत होते. कोणी झाडावर चढत होते. कोणी फुटबॉल खेळत होते. सर व सर्व शिक्षिका त्यांच्यावर लक्ष ठेवत होते. इतक्यात बॉल आणायला झुडुपात गेलेल्या विकीला साप चावला व तो मोठ्याने ओरडला आणि खाली पडला. सगळी मुले धावली. सुरेंद्र , शकील ही धावले काय घडलं ते त्यांनी पाहिलं. काही दिवसांपूर्वी त्यांना स्काऊट मध्ये वैद्यकीय प्रथमोपचार शिकवले होते. त्या चौघांनी एकदम एकमेकांकडे पाहीले व पटकन पुढे जाऊन दोघांनी विकीचे पाय धरले. सुरेंद्र व पार्थने आपले शर्ट काढून विकीच्या जखमेवर घट्ट बांधले. विकी ओरडत होता. शिक्षकही धावले. शकील व जॉनने त्याला उचलून बसकडे पळत नेले. तोपर्यंत सुरेंद्र व पार्थने ओरडून बसचालकाला बस सुरु करायला सांगितले व शिक्षकांनी त्याला बसमधून डॉक्टरकडे नेले व त्यावर उपचार केले.

प्रश्न १) मुलांवर लक्ष कोण ठेवत होते-

२) वैद्यकीय प्रथमोपचार कोठे शिकवले होते-

३) विकी झुडपात कशाला गेला होता-

४) विकीच्या जखमेवर शर्ट कोणी बांधला-

**प्रश्न २.अ)थोडक्यात उत्तरे लिहा.(कोणतेही दोन).** **(४)**

१) या भारतात या कवितेत प्रत्येकाने कोणते गुण अंगी बनवावे असे म्हटले आहे?

२) मुख्याध्यापकांनी मुलांचा सत्कार का केला?

३) गाडगे महाराजांच्या उपदेशाचा तुमच्या जीवनात तुम्ही कसा उपयोग कराल?

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.( कोणतेही तीन).** **(३)**

१) गाडगे महाराजांना कशाची तळमळ असायची?

२) शाळेची सहल कुठे गेली होती?

३) या भारतात या कवितेचे कवी कोण आहेत?
४) महात्मा गांधीजींनी आपल्याला कोणती शिकवण दिली आहे?

**क) कवितेच्या ओळींचा अर्थ स्पष्ट करा.** **(२)**

१) हा जाती भाव विसरूनिया एक हो आम्ही
अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगातून
खळनिंदका मनीही सत्य न्याय दिसू दे!

**प्रश्न ३.अ) कोण कोणास म्हणाले ते लिहा.** **(२)**

१) “मी शेवटच्या रेषेपर्यंत धावून शर्यत जिंकली.”
२) “ या मुलाला अगदी वेळेवर येथे आणले.”

**ब) कंसातील शब्द योग्य ठिकाणी भरून रिकाम्या जागा भरा.** **(३)**

**( वीर व शीलवान,मित्र,सामाजिक न्याय)**

१) मुले एकमेकांचे चांगले ______होते.
२)_______ देण्यासाठी विविध गावांना भेटी देत असत.
३) उद्योगी तरुण ______________दिसू दे.

**क) खालील वाक्प्रचार व त्यांचे अर्थ यांच्या जोड्या जुळवा.** **(२)**

| **अ.** | **ब** |
|---|---|
| १) मतभेद नसणे | प्रवीण असणे |
| २) शिकवण देणे | विचारांचा फरक नसणे |
| | शिकवणे |

**प्रश्न४.अ) समानार्थी शब्द लिहा.(कोणतेही दोन)** **(२)**

१) वेश - २) क्रीडा -. ३) तरुण

**ब) विरुद्धार्थी शब्द लिहा.(कोणतेही दोन)** **(२)**

१) राग - २) नित्य-. ३) गुरु-

**क) वचन बदला.(कोणतेही दोन)** **(२)**

१) मन - २) टोपी-. ३) चांगला

**प्रश्न ५) खालील वाक्यातील सर्वनाम ओळखून त्यांचे प्रकार ओळखा..(कोणतेही तीन)** **(३)**

१) त्यांच्या काळात विचार जुने होते.
२) मी रोज सराव करतो.
३) हा देश महान आहे.
४) तुम्ही महात्मा गांधीजींच्या विचारांचे पालन करा.

**ब) खालील वाक्याचा काळ ओळखा.(कोणतेही दोन)** **(२)**

१) त्यांच्या विचाराने तुमचे आयुष्य बदलेल.
२) गाडगे महाराज समाज सुधारक होते.

**क)खालीलपैकी कोणतीही एक कृती करा.** **(५)**

१) निबंध लेखन- संत गाडगे महाराज
२) तुमच्या शाळेच्या बागेसाठी झाडांची मागणी करण्यासाठी नर्सरीच्या व्यवस्थापकांना पत्र लिहा.